# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय,

## राजगुरुनगर

## विद्यार्थी विकास मंडळ

### निर्भय कन्या अभियान

दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यार्थी कल्याण मंडळाच्या वतीने महाविद्यालयात 'निर्भय कन्या अभियान' उत्साहात आयोजित करण्यात आले. या अभियानाचा उद्देश विद्यार्थिनींमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, महिलांचे हक्क व कायद्यांची माहिती देणे तसेच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देऊन आत्मविश्वास व स्वावलंबन वाढविणे हा होता.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. स्नेहल तांबे यांनी विद्यार्थिनींना महिला आरोग्य, पोषण, वैयक्तिक स्वच्छता आणि मानसिक आरोग्य याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर ॲड. मनीषा संदीप पवळे यांनी महिलांचे घटनात्मक हक्क, अधिकार, विविध कायदे, नियमसंहिता तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी उपलब्ध असलेल्या कायदेशीर तरतुदींची माहिती दिली.

यानंतर श्री. प्रतीक नेवसे यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देत विविध प्रसंगांमध्ये स्वतःचे संरक्षण कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी या प्रशिक्षणामध्ये उत्साहाने सहभाग घेतला.

सदर कार्यक्रमात महाविद्यालयातील ६० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या अभियानामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, सुरक्षिततेची जाणीव आणि कायदेशीर अधिकारांविषयी जागरूकता निर्माण झाली. विद्यार्थी कल्याण मंडळाच्या नियोजनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

प्रा. के. डी. मांडगे

विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी

साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालय







